१३वा सामना

लखनौ सुपरजाएंटस् वि. पंजाब किंग्स

वेळ : ७.३० वा. स्थळ : लखनऊ

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




सोलापूर शहराचे तापमान

कमाल तपमान ४०.८

किमान तपमान २७.६


www.surajyadigital.com । मंगळवार, दि. १ एप्रिल २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १८२ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


# एकाच दिवशी तिघांची गळफास घेऊन आत्महत्या

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूरसह जिल्ह्यात एकाच दिवशी तिघांनी आत्महत्या केली. शहरात एक तर उत्तर सोलापूर तालुक्यात दोघांनी वेगवेगळ्या कारणांतून सोमवारी गळफास घेऊन आपले जीवन संपविले. याप्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील भगवान नगर झोपडपट्टी पोलीस मुख्यालयाच्या सार्वजनिक पाण्याच्या टाकीला विनायक बाबुराव पवार (वय ३०, रा. भगवान नगर, झोपडपट्टी) या युवकाने अज्ञात कारणावरून ओढणीच्या साह्याने गळफास घेत जीवन संपविले.

**उत्तर सोलापूर** : उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नज मधील गवळी गल्ली येथील द्रौपदी महादेव गवळी (वय ५८) या महिलेने शाररिक त्रासाला कंटाळून आत्महत्या केली.




पोलीस पाटील यांनी दिलेल्या माहिती वरून द्रौपदी या गेल्या वर्षभरापासून शाररिक त्रासाला कंटाळल्या होत्या. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने वारंवार खर्च करणे परवडत नव्हते. घरात कोणीही नसलेले पाहून घरातील वासाला दोरी बांधून गळफास घेऊन आपले आयुष्य संपविले आहे. लोकांनी त्यांना सिव्हिल येथे दाखल केले पण उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात मुलगा,सून दोन विवाहित मुली,जावई व नातू असा परिवार आहे.

**घरगुती भांडणामुळे युवकाची आत्महत्या**



उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा येथील श्रीकृष्ण विश्वास पवार रा-वडाळा वय३० याने राग अनावर झाल्याने घरातील लोखंडी अँगलला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. सदर घटनेची नोंद तालुका पोलीस स्टेशनमध्ये नोंद झाली आहे.बेशुद्ध अवस्थेत सोलापूर येथील छत्रपती सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले असता उपचारापूर्वीच डॉक्टरांनी मृत घोषित केले आहे.



पोलीस पाटील यांनी दिलेल्या माहिती वरून श्रीकृष्ण हा वाहन चालक होता. वाहन चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होता.आर्थिक कारण, घरगुती व किरकोळ कारणावरून पती-पत्नीमध्ये नेहमी भांडण होत होते राग अनावर झाल्याने श्रीकृष्ण याने स्वतः च्या घरातील लोखंडी अँगलला गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याच्या पश्चात आई वडील पती व दोन मुली असा परिवार आहे.

# तरूणाच्या खून प्रकरणी दोघांना पोलीस कोठडी, अन्य दोघे पसार

## दोघांच्या अटकेसाठी पोलिसांची पथके रवाना

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

**येथील एका तरूणाच्या खून प्रकरणी पसार झालेल्या दोन आरोपींना पंढरपुरातच पकडण्यात पोलिसांना यश आले आले असून नवनाथ आटकळे आणि सिंघम यांना अटक झालेली आहे. बाकीचे दोन आरोपी फरार आहेत. त्यांना शोधण्यासाठी पोलिसांनी दोन पथके तयार केली आहेत. अटक करण्यात आलेल्यांना कोर्टापुढे पुढे उभे केले असता त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी मिळालेली आहे.**

येथील रेल्वे रूळावर हात-पाय तुटलेले तसेच शरीर छिन्नविछिन्न होऊन मयत अवस्थेत सापडलेल्या तारापूर येथील २७ वर्षीय तरूणाचा अपघात नाही, तर खून झाला असून पुरावा नष्ट करण्यासाठी त्याला रूळावर टाकण्यात आल्याची तक्रार पोलिसांत दाखल करण्यात आली आहे.

अभिषेक अशोक कदम (वय २७, रा. तारापूर) असे मयत तरूणाचे नांव आहे. त्याचे वडील अशोक नारायण कदम यांनी याबाबतची फिर्याद कुर्डूवाडी रेल्वे पोलिसांत दिली असून ती पंढरपूर शहर पोलिसांत वर्ग झाली आहे. त्याानुसार नवनाथ भगवान आटकळे, सागर, शिंघण, अम ोल आटकळे व संदीप मांडवे (रा. पंढरपूर) अशा चार जणांविरूद्ध गुन्हा नोंद झाला आहे.

यातील मयत अभिषेक हा नवनाथ आटकळे याच्याकडे डी.जे. ऑपरेटर म्हणून कामास होता. दि. १६ मार्च रोजी नेहम ीप्रमाणे तो कामासाठी शेगांव दुमाला येथे गेला.

मात्र, त्याानंतर घरी परतलाच नाही. घरच्या लोकांनी सर्वत्र शोधाशोध केली. तरीही थांगपत्ता लागत नसल्याने दुसऱ्या दिवशी तालुका पोलीस ठाण्यात तो हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली. सदर तक्रारीनुसार तालुका पोलिसांनी आटकळे याच्याकडे चौकशी सुरू केली. त्यामुळे आटकळे याच्यासह इतर संशयितांनी मयत अभिषेक याचा भाऊ आणि वडिलांना दमदाटी करण्यास सुरूवात केली.

दरम्यान, फिर्यादी कदम यांनी दि.२१ मार्च रोजी मुंबईत गृहराज्यमंत्री योगेश कदम यांची भेट घेऊन त्याांच्याकडे व्यथा मांडली. त्याानुसार तात्काळ मंत्री कदम यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधून या प्रकरणात सखोल चौकशी करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर तपासाची सूत्रे हलली. मात्र, दुसऱ्या दिवशी (दि.२२) मयत अभिषेक याच्या विरूद्ध शहर पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला.

दि.२७ मार्च रोजी तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार नितीन चवरे यांनी फिर्यादी कदम यांना बोलावून घेतले. त्याांना रेल्वे पोलिसांकडे नेले. त्याा ठिकाणी रेल्वे अपघातातील मयताचे फोटो दाखविण्यात आले. त्यात अभिषेक कदम याचेही शरीर छिन्नविछिन्न झालेले फोटो होते.

सदरचा अपघात नसून यातील संशयित चौघांनी अभिषेक याचा शारीरिक व म ानसीक छळ करून, ठार मारून पुरावा नष्ट करण्यासाठी रेल्वे रूळावर टाकल्या असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. अभिषेक हा दि.१६ मार्च रोज़ी पहाटे एका मुलीला वाईट भावनेने भेटायला गेल्याच्या रागातून हा खून झाल्याचा आरोप यामध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकाराला वेगळेच वळण मिळाले आहे.

# सलग सुट्ट्यांमुळे पंढरी ओव्हरपॅक

## विठुरायाच्या दर्शनाची रांग चंद्रभागेच्या तीरापर्यंत

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

सलग तीन दिवसांच्या सुट्ट्यांमुळे श्रीविठुरायाची पंढरी भाविक आणि पर्यटकांनी ओव्हरपॅक झाली होती. वारकऱ्यांचे आराध्य दैवत असलेल्या पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी मोठी गर्दी होती. पंढरपूर ओवरपॅक झाले होते. विठुरायाच्या दर्शनाची रांग थेट चंद्रभागातिरावरील सारडा भवनपर्यंत पोहोचली होती. दर्शनरांग लांब गेल्याने खाली मॅट नव्हते. त्यामुळे भाविकांचे पाय उन्हामुळे भाजले. डोक्यावर असणारा सूर्यदेव आग ओकत होता. तरीही भाविकांना त्याची तमा नव्हती.

शनिवार त्याानंतर आलेला गुढीपाडवा आणि आजची रमजान ईद अशा मिळालेल्या सलग सुट्ट्यांमुळे हजारो भाविक, पर्यटक सध्या विठ्ठल दर्शनासाठी पंढरपुरात आलेले आहेत. मात्र दर्शन रांगेतील भाविकांना या कडाक्याच्या उन्हात पाय भाजू नयेत यासाठी जी खबरदारी घ्यायला हवी ती मंदिर समि तीकडून घेतली गेलेली नाही. दर्शन रांगेत काही ठिकाणी जुने मॅटचे तुकडे टाकले होते. त्याच ठिकाणी पाय भाजत भाविकांना रांगेतून पुढे सरकावे लागले. यातच पिण्याच्या पाण्याची कोणतीही सोय रांगेत नसल्याने भाविक हैराण झाले होते. वास्तविक दर्शन रांगेसाठीचा ठेका मंदिर समितीने दिलेला असला तरी हा ठेकेदार



काय करतोय याबाबत प्रशासन डोळे मिटून शांत आहे. आता तरी प्रशासनाने जागे होऊन दर्शन रांगेत मॅट टाकून पिण्याच्या पाण्याची सोय केल्यास भाविक देवाचे सुलभ दर्शन घेऊ शकतील. मराठी नववर्षाच्या पार्श्वभूम ीवर देखील मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी पंढरपुरमध्ये पाहायला मिळाली.






# मंत्रीपदाची खदखद बाहेर पडली आ.देशमुखांनी अखेर वाचा फोडली

✔ सोलापूर/प्रतिनिधी

माणसाने मनात साठलेल्या भावना मोकळ्या केल्या पाहिजेत. त्या जर तशाच पोटात साठवून ठेवल्या तर त्याचा एक ना एक दिवस विस्फोट होते, असे म्हणतात. त्या शास्त्रानुसार गेल्या काही वर्षांपासून मनात साचलेला राजकीय राग बाहेर पडला. ५ आमदार निवडून देवूनही सोलापूर जिल्ह्याला मंत्रीपद मिळाले नाही, याची खंत भाजपच्या नेत्यांना लागून आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरच्या दौऱ्यात त्याविषयी ब्र देखील काढला नाही. त्यामुळे ही चिंता अधिकच वाढली आहे. अखेर शहर उत्तरचे आमदार विजय देखमुख यांनी मनात खदखदत असलेल्या भावनांना सोमवारी वाट मोकळी करून दिली. महायुतीच्या सरकारमध्ये सोलापूरला मंत्रीपद बघणे अवघड वाटत आहे, अशी भीती त्यांनी एका कार्यक्रमात व्यक्त केली

मागील अडीच-तीन वर्षांच्या काळात म्हणजेच पुन्हा महायुतीचे सरकार आल्यानंतर आणि त्यानंतर तीन चार महिन्यांपूर्वी सत्तेवर आलेल्या महायुती सरकारमध्ये सोलापूरला मंत्रिपद मिळालेले नाही. तब्बल पाच वेळा निवडून आलेले विजयकुमार देशमुख यांनी त्याबाबतची खंत विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमात बोलून दाखवली. भाजपचे सरकार आल्यावर सोलापूरला मंत्री बघणे अवघड आहे, भाजपचे सर्व मंत्री सोलापूरकडे दुर्लक्ष करतात,'अशा शब्दात आ.देशमुखांनी व्यक्त केलेली ही खंत म्हणजे भाजपला घरचा आहेर दिल्याचे मानले जात आहे.

विधान परिषदेच्या सभापती तथा अहिल्यानगरचे भाजप नेते प्रा. राम शिंदे हे सोमवारी सोलापूरच्या दौऱ्यावर आले होते. सभापतीपदी निवड झाल्याबद्दल प्रा. राम शिंदे यांचा सोलापूरमध्ये धनगर समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्या सत्कार समारंभात बोलताना आमदार देशमुख यांनी आपल्या मनातील खंत बोलून दाखवली.

माजी मंत्री तथा आमदार विजयकुमार देशमुख यांनी स्वपक्षीय मंत्र्यांबाबत खंत व्यक्त केली. ते म्हणाले, भारतीय जनता पक्षाचे सरकार आल्यावर सोलापूरला मंत्री बघणे अवघड आहे. भाजपचे सर्व मंत्री सोलापूरकडे फार दुर्लक्ष करतात. मात्र, सभापती झाल्यावर तुम्ही सोलापूरला भेट दिलीत, ही मोठी गोष्ट आहे, असे सांगून देशमुख यांनी सोलापूर भाजपमधील खंत बोलून दाखवली. विजयकुमार देशमुख हे मंत्रिपदासाठी इच्छूक होते. मात्र, देशमुख यांना डावलण्यात आले. त्यामुळे मंत्रिपद न मिळाल्याची खंत त्यांच्या मनात आहे.

देशमुख म्हणाले, विधान परिषदेचे सभापती झाल्यावर तुम्ही सोलापूरला भेट दिलीत, ही मोठी गोष्ट आहे. राम शिंदे हे दिलदार माणूस आहे. त्यांचा सत्कार होतोय त्याचा मला आनंद आहे. भाजप सरकारच्या २०१४ ते २०१९ या काळात सोलापूर शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख यांनी सोलापूरचं पालकमंत्रिपद भूषवलं होतं. मात्र, २०१९ नंतर आजतागायत एकही मंत्री पद मिळालं नाही.




### मंत्रीपद का मिळू शकले नाही

विधानसभेच्या निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यातील भाजपचे पाच आमदार निवडून आले आहेत. महायुती सरकारमध्ये आमदार सुभाष देशमुख, विजयकुमार देशमुख आणि सचिन कल्याणशेट्टी यांची नावे मंत्रिपदासाठी आघाडीवर होती. मात्र दोन देशमुखांमधील गटबाजीमुळे सोलापूरचे मंत्रीपद हुकल्याची चर्चा आहे. मात्र, मागील अडीच ते तीन वर्षे आणि आताच्या महायुती सरकारमध्ये सोलापूरला मंत्रिपदाची संधी मिळू शकलेली नाही.सोलापूरला मंत्रीपद का मिळू शकले नाही, याविषयी प्रदेश पातळीवरचे भाजपचे नेतेही काहीच बोलायला तयार नाहीत तसेच स्थानिक आमदार व भाजप नेते त्यावर एकत्र बसून चिंतन करायला तयार नाहीत, असे दिसत आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




एप्रिल फुल!

| | |
|---|---|
| संगम श्री डे | 236-15-249 |
| संगम श्री नाईट | 129-20-668 |
| कल्याण | 128-12-336 |
| मुंबई | 780-50-244 |